


║ वर्ष - 8 ।अंक - 67 ║ UDYAM-MH-26-0158827 ║

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!






www.mahaenews.com | शुक्रवार, दिनांक 13 सप्टेंबर 2024 | पुणे आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews


## पुणेकरांनो, यंदाचे गणेश विसर्जन होणार दणक्यात!

# ढोल-ताशा पथकांना ‘सर्वोच्च’ दिलासा!



### ढोलताशा वादनावरील निर्बंधांना सुप्रीम कोर्टाची स्थगिती; नसरन्यायाधीश चंद्रचूड यांनी दिला आदेश

।पुणे ।महाईन्यूज

**पुण्यातील ऐतिहासिक गणेश विसर्जन मिरवणूक म्हंटली तर ढोल-ताशा आलेच. या ढोल ताशांचा आवाज अगदी गगनाला भिडतो. पुण्यात गणपती विसर्जन मिरवणुकीदरम्यान अत्यंत उत्साहाचे वातावरण असते. या वैभवशाली मिरवणुका पाहण्यासाठी देश-विदेशातील पाहुणे पुण्यात येत असतात. पण हरित लवादाच्या एका निर्णयामुळे ढोल-ताशा पथकांच्या उत्साहाला मर्यादा येणार होत्या. मात्र आता सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनी एक मोठा निर्णय घेत ढोल-ताशा पथकांना मोठा दिलासा दिला आहे.**

ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी गणेश विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्या ३० एवढीच मर्यादित ठेवण्याच्या राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या (एनजीटी) निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने गुरुवारी अंतरिम स्थगिती दिली. ढोल-ताशा हे पुण्याचे हृदय असून, पथकांना त्यांचे वादन करू द्या, असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठाने म्हटले आहे. न्यायालयाने या प्रकरणी राज्य सरकारला नोटीस बजावली आहे. त्यामुळे ‘एनजीटी’च्या आदेशामुळे ढोल-ताशांचा बसलेला ‘आव्वाज’ पुन्हा वाढण्याची चिन्हे आहेत.

गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियमांचे उल्लंघन झाल्याप्रकरणी श्रवणतज्ज्ञ डॉ. कल्याणी मांडके यांनी ॲड. मैत्रेय घोरपडे यांनी ‘एनजीटी’त याचिका दाखल केली होती. ही याचिका ३० ऑगस्टला निकाली काढताना ‘एनजीटी’ने ढोल-ताशा पथकातील वादकांच्या संख्येवर नियंत्रण आणले होते. विसर्जन मिरवणुकीत प्रत्येक ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्या तीसपेक्षा जास्त नसावी, या नियमांचे उल्लंघन झाल्यास पोलिसांनी ढोल-ताशा-झांज ही वाद्ये जप्त करावी, असे निर्देश ‘एनजीटी’ने दिले होते. त्याविरोधात पुण्यातील वंदे मातरम संघटनेच्या युवा वाद्य पथक ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अनिश पाडेकर यांनी ॲड. अमित पै व ॲड. तेजस दंडगव्हाळ यांच्यामार्फत सर्वोच्च न्यायालयात आव्हान याचिका दाखल केली होती.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर दुपारी दोन वाजता या याचिकेवर सुनावणी घेण्यात आली. ‘पुण्यात ढोल-ताशा वादनाचे शंभर वर्षांहून अधिक काळापासून मोठे सांस्कृतिक महत्त्व आहे. लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांनी गणेशोत्सवाची सुरुवात केली. हा उत्सव जवळ आला असताना, ढोल-ताशा पथकांची कोणतीही बाजू ऐकून न घेता ‘एनजीटी’ने हा आदेश दिला असून, ढोल-ताशा-झांज वादन करणाऱ्या पथकांवर त्याचा गंभीर परिणाम होईल,’ अशी बाजू ॲड. अमित पै यांनी मांडली. त्यावर, सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार व पुणे प्रशासनाला नोटीस काढण्याचा आदेश दिला; तसेच, ढोल-ताशा-झांज पथकातील वादकांची संख्येवर मर्यादा आणणाऱ्या ‘एनजीटी’च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिली. या प्रकरणी आता चार ऑक्टोबरला सुनावणी होणार आहे.

### ‘वाजवायची अन् गाजवायची संधी’

‘सर्वोच्च न्यायालयाने ‘एनजीटी’च्या आदेशाला अंतरिम स्थगिती दिल्यामुळे ढोल-ताशा पथकांना यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत वाजवायची अन् गाजवायची संधी मिळाली आहे. गणेशोत्सवात ढोल-ताशा वादनाची अनेक वर्षांची परंपरा असताना ‘एनजीटी’चा निकाल लागू करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयापुढे आमची बाजू मांडण्याची संधी मिळाली आहे,’ असे ‘ढोल ताशा महासंघ, महाराष्ट्र’चे अध्यक्ष पराग ठाकूर म्हणाले.

> पुणे पोलिसांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर यापूर्वीच एक नियमावली प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार एका पथकात ४० ढोल आणि १० ताशांना परवानगी आहे. त्याची अंमलबजावणी काही वर्षांपासून होत असून, यंदा तीच नियमावली कायम असेल.
>
> – **अमितेश कुमार,** पोलिस आयुक्त

# मोहितेंना लाल दिव्याची गाडी देणार?

## अजित पवारांचं वक्तव्य; जागा वाटपावरही केलं भाष्य

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आळंदी खेडची जागा (विधानसभा मतदारसंघ) आपल्याकडे आली तर दिलीप मोहिते यांना पुन्हा एकदा निवडून द्या”, असं आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रमुख अजित पवार यांनी केलं आहे. अजित पवार हे आज (१२ सप्टेंबर) आळंदी येथील एका कार्यक्रमात बोलत होते.**



यावेळी अजित पवारांनी उपस्थित नागरिकांना आगामी विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा आमदार दिलीप मोहिते यांना निवडून देण्याचं आवाहन केलं. तसेच, “तुम्ही दिलीप मोहिते यांना आमदार करा तुमच्या मतदारसंघाला लाल दिव्याची गाडी मिळेल”, असंही अजित पवार यांनी यावेळी म्हटलं आहे. “महायुतीच्या जागावाटपात खेड-आळंदीची जागा आपल्याकडे आली तर आपण पुन्हा एकदा दिलीप मोहिते यांना संधी देऊ, तुम्ही त्यांना आमदार करा”, असं पवार म्हणाले.अजित पवार म्हणाले, “महायुतीत जागावाटपावर अद्याप चर्चा पूर्ण झालेली नाही. महायुतीमधील नेते यावर चर्चा करत आहेत. कोणतीही जागा जाहीर झालेली नाही. मात्र महायुतीमध्ये ही जागा (आळंदी-खेड) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मिळाली तर आपल्या वतीने दिलीप मोहिते यांना पुन्हा एकदा उभं करू. साधारण येथील सर्वांचाच कल आहे की विद्यमान आमदारांना (दिलीप मोहिते) अजून एकदा संधी द्यायला हवी. मग तुमच्या मनातलं एक अपूर्ण राहिलेलं लाल दिव्याच्या गाडीचं स्वप्न आपण पूर्ण करू. लाल दिव्याच्या गाडीचं स्वप्न सरपंचपदापासून आमदारपदापर्यंत पोहोचलं आहे, आता अनेकांना वाटतंय थोडं पुढे जावं, लाल दिव्यापर्यंत पोहोचावं. हा प्रवास लाल दिव्याच्या गाडीपर्यंत पोहोचला पाहिजे असं तुम्हा सर्वांना वाटतं आणि मला देखील त्याची कल्पना आहे. मागच्या निवडणुकीत या जिल्ह्याने मला खूप साथ दिली. खेड-आळंदी, राजगुरुनगर, चाकणकरांनो मी तुम्हाला आवाहन करतो की यंदाच्या निवडणुकीत पुन्हा एकदा मला साथ द्या”.दरम्यान, यावेळी अजित पवारांनी सर्व नेत्यांना धर्मांबाबत जपून बोलण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले, राजकीय पक्षातील एखादी व्यक्ती एखाद्या समाजाबद्दल, एखाद्या घटकाबद्दल किंवा धर्माबद्दल वाईट बोलते, तेव्हा त्याच्यामुळे दोन समाजांमध्ये दुही निर्माण होते. तुम्हाला तुमच्या विचारधारा मांडायच्या असतील तर खुशाल मांडा. तुम्हाला त्याचा अधिकार आहे. त्यामुळे तुम्ही तुमचं मत मांडायला हरकत नाही. परंतु, तुम्ही वेगळ्या पद्धतीने बोलता आणि समाजांमध्ये दुही निर्माण करता. समाजात तेढ निर्माण करता, जे समाजासाठी चांगलं नाही. हा शिव-शाहू-फुले-आंबेडकरांचा महाराष्ट्र ते कदापी खपवून घेणार नाही. तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असल्या गोष्टींचा तीव्र विरोध करत राहील. कठोर शब्दांत आम्ही त्यांचा विरोध करू. तसेच अशा प्रकरणांमध्ये जी काही कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता असेल ती करायला आम्ही मागे पुढे पाहणार नाही. यावेळी अजित पवारांनी उपस्थित नागरिकांना आगामी विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा आमदार दिलीप मोहिते यांना निवडून देण्याचं आवाहन केलं. तसेच, “तुम्ही दिलीप मोहिते यांना आमदार करा तुमच्या मतदारसंघाला लाल दिव्याची गाडी मिळेल”, असंही अजित पवार यांनी यावेळी म्हटलं आहे. “महायुतीच्या जागावाटपात खेड-आळंदीची जागा आपल्याकडे आली.

### जागावाटपावर चर्चा पूर्ण झालेली नाही

तुम्ही त्यांना आमदार करा”, असं पवार म्हणाले.अजित पवार म्हणाले, “महायुतीत जागावाटपावर अद्याप चर्चा पूर्ण झालेली नाही. महायुतीमधील नेते यावर चर्चा करत आहेत. कोणतीही जागा जाहीर झालेली नाही. मात्र महायुतीमध्ये ही जागा (आळंदी-खेड) राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला मिळाली तर आपल्या वतीने दिलीप मोहिते यांना पुन्हा एकदा उभं करू. साधारण येथील सर्वांचाच कल आहे की विद्यमान आमदारांना (दिलीप मोहिते) अजून एकदा संधी द्यायला हवी. मग तुमच्या मनातलं एक अपूर्ण राहिलेलं लाल दिव्याच्या गाडीचं स्वप्न आपण पूर्ण करू. लाल दिव्याच्या गाडीचं स्वप्न सरपंचपदापासून आमदारपदापर्यंत पोहोचलं आहे.

# महिलांनी साकारला ‘लाडकी बहीण योजने’चा देखावा

## देखावा पाहण्यासाठी परिसरातील महिलांनी केली गर्दी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**करोना योद्धा महिला बचत गटाने घरगुती गणेशोत्सवात मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेचा लाभ घेणाऱ्या बहिणींचा आकर्षक देखावा साकारला आहे. हा देखावा पाहण्यासाठी परिसरातील महिलांनी एकच गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.**




करोनामुळे ज्या महिलांच्या पतींचे निधन झाले, अशा महिलांना एकत्र करून महापालिकेच्या समाज विकास विभागामार्फत उमेद जागर उपक्रमाअंतर्गत करोना योद्धा महिला बचत गटाची निर्मिती करण्यात आली आहे. थेरगाव येथील या करोना योद्धा महिला बचत गटातील महिलांनी गणेशोत्सवातील बहिण भावाचा महत्वपूर्ण सोहळा असलेल्या गौरी-गणपती सजावट पूजनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या राज्य शासनाच्या महत्वकांक्षी योजनेचा आकर्षक देखावा साकारला आहे. या देखाव्यात गौरी अर्थात लाडक्या बहिणी या राज्यशासनाच्या लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत असल्याचे चित्र उभे करण्यात आले आहे. वैशाली खरात यांनी दिली आहे. करोनामुळे ज्या महिलांच्या पतींचे निधन झाले अशा महिलांना मथेरगाव येथे महिला करोना योद्धा महिला बचत गटाचे युनिट स्थापन करण्यात आले आहे. महापालिकेने त्यांना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन दिले असल्याची माहिती महापालिकेच्या समाज विकास विभागाचे सहायक आयुक्त तानाजी नरळे यांनी दिली आहे.

### महत्वकांक्षी योजनेचा आकर्षक देखावा

राज्य शासनाची मुख्यमंत्री लाडकी बहिण ही योजना महत्वकांक्षी आहे. या योजनेअंतर्गत अडीच लाख उत्पन्न असलेल्या महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्यात येत आहेत. राज्यभरात योजनेची जोरदार चर्चा आहे. आता गणेशोत्सवात देखील या योजनेसंदर्भात देखावे सादर केले जात असल्याचे दिसून येत आहे.थेरगाव येथील या करोना योद्धा महिला बचत गटातील महिलांनी गणेशोत्सवातील बहिण भावाचा महत्वपूर्ण सोहळा असलेल्या गौरी-गणपती सजावट पूजनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण या राज्य शासनाच्या महत्वकांक्षी योजनेचा आकर्षक देखावा साकारला आहे.

## ज्ञानेश महाराव, शरद पवार यांच्या निषेधार्थ आंदोलन, हिंदू समाजाची माफी मागा

# अन्यथा महाराष्ट्रात फिरू देणार नाही!

## हिंदू विरोधी विचारांना बळ देण्याचे कार्य शरद पवार करतात : अनुप मोरे




। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**संभाजी ब्रिगेडच्या अधिवेशनामध्ये ज्ञानेश महाराव यांनी प्रभू रामचंद्र आणि श्री स्वामी समर्थांच्या संदर्भात आक्षेपार्ह वक्तव्य केले. यावेळी मंचावर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार उपस्थित होते. शरद पवारांनी सर्व विधानांना पाठींबा दिल्याचा आरोप करत सकल हिंदू समाज संघटनांनी ज्ञानेश महाराव आणि खासदार शरद पवारांविरोधात पिंपरी चिंचवडमध्ये आंदोलन केले. यावेळी भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी शरद पवारांवर जोरदार हल्लाबोल केला.**

भाजप आणि सकल हिंदू समाज संघटनांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, डांगे चौक येथे शरद पवारांविरोधात निषेध नोंदवण्यात आला. जसा पाकिस्तान आतंकवाद पोसतो, तसा हिंदू विरोधी विचार आणि माणसं शरद पवार पोसतात. आयसीस, पीएफआय सारख्या संघटनांकडून हिंदू धर्माला धोका आहे. तसाच शरद पवारांपासून हिंदू धर्माला धोका आहे. हिंदू विरोधी विचार करण्याचे आणि त्याला बळ देण्याचे कार्य शरद पवार करतात. हिंदू विरोधी वक्तव्य करणारा प्रत्येक माणूस शरद पवारांशीच कसा संबंधित असतो? असा सवाल त्यांनी यावेळी उपस्थित केला. आमच्या हिंदू देवतांचा अवमान सहन करून घेणार नाही. अवमानकारक वक्तव्य करणाऱ्या ज्ञानेश महाराव आणि त्याला मुख समर्थन देणाऱ्या खा. शरद पवार यांनी हिंदू समाजाची माफी न मागितल्यास त्यांना महाराष्ट्रात फिरू देणार नाही, असा इशारा देखील मोरे यांनी दिला.

यावेळी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह नरेंद्र पेडसे, प्रदेश युवा मोर्चा अध्यक्ष अनुप मोरे, आमदार उमाताई खापरे, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे, प्रदेश सदस्य मोरेश्वार शेडगे, महेश कुलकर्णी, राष्ट्रीय सेविका समितीच्या जिल्हा कार्यवाहीका भारती तारे, शिवसेनेचे जिल्हा प्रमुख बाळासाहेब वाल्हेकर, भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके, चिंचवड विधानसभा प्रमुख काळुराम बारणे, युवा मोर्चा अध्यक्ष तुषार हिंगे, विश्व हिंदू परिषदेचे धनंजय गावडे, नंदकुमार कुलकर्णी, विशाल मासुळकर, पिंपरी चिंचवड जिल्हा सहमंत्री रविंद्र देशपांडे, प्रदेश सचिव अजित कुलथे, माजी नगरसेवक अभिषेक बारणे, अनुसूचित जाती मोर्चा प्रदेश सचिव धनंजय बिर्दा, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, प्रसाद कस्पटे, युवा मोर्चा सरचिटणीस सतीश नागरगोजे, शिवम डांगे, राहुल खाडे, सतिश नागरगोजे, सनी बारणे, सचिन बंदी, मोहन राऊत, उपाध्यक्ष रवी भिलारे, सचिव सागर घोरपडे, नम्रता माळी, थेरगाव वाकड मंडल अध्यक्ष दिगंबर गुजर, सोशल मिडिया जिल्हा संयोजक आदम मुलानी, गजेंद्र जाट, निमित साकार, दिपक काटे, रोहन बारणे, अजित कदम, दिपक शिंदे यांच्यासह सकल हिंदू समाज संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा सहकार्यवाह नरेंद्र पेंडसे म्हणाले की, राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार आणि खासदार छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थित ज्ञानेश महाराव याने प्रभू श्रीराम, वारकरी संप्रदाय, आणि स्वामी समर्थ व हिंदु समाजातील महापुरुषांच्यावर चिखलफेक केली आणि गरळ ओकली. त्याला खा. शाहू महाराज यांनी विरोध करायला हवा होता. परंतु, तसे झाले नाही. मुख्य वक्त्यांचे भाषण संपले असताना सुद्धा महाराव याला बोलण्याची संधी दिली जाते, त्याच्या वक्तव्याला दाद दिली जाते. महाराव यांचा बोलविता धनी खा. शरद पवार यांच्याकडून नेहमीच हिंदू समाजाच्या भावना दुखविण्याच्या घटनांना प्राधान्य दिले जाते. हिंदू धर्माचा अवमान करून एका विशिष्ट धर्माची मते मिळविण्याचा हा केविलवाणा प्रयत्न शरद पवार यांच्याकडून सूरू असल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला.

### जनतेला ही ढोंगी श्रद्धा दिसून येत आहे

भाजपा सरचिटणीस नामदेव ढाके म्हणाले की, हिंदू देवीदेवतांचे अवमान करण्याचा कोणाला अधिकार नाही. ज्ञानेश महाराव आणि खा. शरद पवार यांनी देवतांचा अवमान केला आहे. स्वतः छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खा. शाहू महाराज देखील या अधिवेशनात उपस्थित होते. त्यांनी देखील महाराव यांना बोलतांना थांबविले नाही. ज्ञानेश महाराव यांनी शरद पवार यांच्यासमोर प्रभू रामचंद्र, विठुराया आणि हिंदूत्वाचा अपमान केला. त्यावर काहीही न बोलता शरद पवार हे कुटुंबियांसोबत सिध्दीविनायक, लालबागच्या राजाच्या दर्शनाला जातात. निवडणुकीसाठी नौटंकी का होईना पण लालबागच्या राजाने शरद पवार यांना सुबुद्धी दिली. पण महाराष्ट्राच्या जनतेला ही ढोंगी श्रद्धा दिसून येत आहे. महाराव यांच्या वक्तव्याला खा. पवार यांची संमती असल्याचे यावरून दिसून येते.

## पवनामाई पूजनाचा सत्ताधाऱ्यांसह प्रशासनाला पडला विसर

## राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने केले 'पवनामाईचे पूजन'


। पिंपरी ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहराचे तहान भागवणारे पवना धरण १०० टक्के भरल्यानंतर प्रतिवर्षी सत्ताधारी व प्रशासकीय अधिकारी पवनामाईचे पूजन करण्यासाठी येत असतात. परंतु यावर्षी धरण पूर्ण क्षमतेने भरलेले असताना देखील निवडणूक तोंडावर असल्याने सत्ताधाऱ्यांना व प्रशासनाला पवना माईचा विसर पडल्याचे जाणवत आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पिंपरी चिंचवड यांच्या वतीने पवनामाईची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी शहरातील पदाधिकारी कार्यकर्ते पवनामाईचे पूजन करण्यासाठी पवना धरण येथे उपस्थित होते.

### यांची होती उपस्थिती...

यावेळी माजी नगरसेविका सुलक्षणा शीलवंत धर, चिंचवड विधानसभा अध्यक्ष सागर चिंचवडे, श्रीमंत जगताप, दिलीप पानसरे, राजेंद्र कदम, इखलास सय्यद, हनुमंत वाबळे, नागेश सदावर्ते, गणेश काळे, सागर लष्करे, पप्पूलाल विश्वकर्मा, जिब्राईल शेख, हेमंत बलकवडे, श्रीकांत पवार, राजकुमार माने, प्रिया कांबळे, वंदना आराख, लक्ष्मीकांत गालफाडे व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.





## भूमिका

# अमेरिकेत भारतीयांची ‘व्होट बँक’

**सुमारे चार वर्षांपूर्वी, २०२०च्या ऑगस्टमध्ये जो बायडेन यांनी कमला हॅरिस यांची उपराष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार म्हणून निवड केली. त्या वेळी एक कृष्णवर्णीय तसेच आशियाई वंशाची स्त्री अध्यक्षपदाच्या एवढ्या जवळ पहिल्यांदाच जात असल्याचे अप्रूप होते. हॅरिस यांच्या निवडीनंतर अमेरिकेत राहणाऱ्या भारतीय वंशाच्या लोकांच्या आनंदाला पारावार उरला नव्हता.**

सगळ्याच भारतीय वंशाच्या लोकांना अभिमानास्पद असा क्षण होताबऱ्याच भारतीयांच्या त्यांच्याबद्दलच्या अपेक्षाही वाढल्या होत्या. हॅरिस यांनी सतत आपल्या भारतीय पूर्वजांचा उदो-उदो करावा, तसेच भारतीय मुद्द्यांवर, भारताच्या बाजूने सतत काही तरी सकारात्मक बोलत राहावे असे यांतील बऱ्याच जणांना वाटत असायचे. पुढील काळात कमला हॅरिस यांनी स्वत:ची कृष्णवर्णीय म्हणून ठेवलेली ओळख तसेच त्यांची काश्मीरसारख्या विषयावरील मतं बऱ्याच भारतीय लोकांचा भ्रमनिरास करून गेली. आता याच हॅरिस थेट राष्ट्राध्यक्षपदाच्या उमेदवार आहेत! आधी बायडेन व आता हॅरिस यांना २०२४च्या अध्यक्षीय निवडणुकीत भारतीय वंशाची मते नेहमीपेक्षा कमी मिळतील, असे कयास बांधले जाऊ लागले. पण खरोखरीच भारतीय वंशाची मते ही अमेरिकेच्या



अध्यक्षीय निवडणुकीत ‘गेम-चेंजर’ आहेत काय, याचे विश्लेषण आकडेवारीच्या आधारे करणे योग्य ठरेल.अमेरिकेतील २०२०च्या जनगणनेनुसार ‘भारतीय-अमेरिकन’ म्हणजेच भारतीय वंशाचे लोक हा इथल्या स्थलांतरितांमधील सगळ्यात वेगाने वाढणारा गट झाला आहे. अमेरिकेतील १९६५च्या स्थलांतर कायद्यापासून विशिष्ट देशांकरिता असलेली कोटा पद्धती रद्द करून आशिया खंडातील लोकांना अमेरिकेत येऊ देण्याचा निर्णय अमलात आला. त्यानंतर भारतीय लोकांची आवक येथे मोठ्या प्रमाणात सुरू झाली. पण अगदी हल्लीपर्यंत अमेरिकेत येणारी आशियाई व्यक्ती ही हमखास चीनमधूनच येताना दिसत असे. खऱ्या अर्थाने १९९० आणि २०१० नंतर अमेरिकेत भारतीय लोकांच्या येण्याचा ओघ वर्षाकाठी वाढू लागला आहे. त्याची कारणे हा एका स्वतंत्र लेखाचाच विषय व्हावा. मुद्दा हा की, गेल्या पंधरा वर्षांत येथे येणाऱ्या भारतीयांची संख्या त्याआधीच्या कित्येक वर्षांच्या तुलनेने दुप्पट झालेली दिसते. २०२३च्या सुरुवातीस भारतीयांची वाढती संख्या चीन व फिलिपिन्स देशांच्या तुलनेत वाढून, मेक्सिको देशाच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकावर आलेली आहे!अमेरिकेतल्या एकंदर सगळ्या स्थलांतरितांच्या तुलनेत भारतीय वंशाचे बहुतेक लोक सुखवस्तू व सुशिक्षित म्हणून गणले जातात. याचे कारण त्यांना येणारी इंग्लिश भाषा, विज्ञान, गणित व तंत्रज्ञान विषयात पारंगत असणे हे होय. अमेरिकेतील अनेक विद्यापीठांत होणाऱ्या संशोधनात्मक कामांत अनेक भारतीयांचे मोठे योगदान आहे. तंत्रज्ञान व आयटी कंपन्यांत भारतीय वंशाच्या लोकांची संख्याही सर्वविदित आहे. भारतीय वंशाच्या लोकांची संख्या वाढून तसेच प्रगती होत असूनसुद्धा अमेरिकेच्या राष्ट्रीय राजकारणात भारतीयांच्या मताला तितके वजन प्राप्त झालेले नाही. नाही म्हणायला २०२४च्या नोव्हेंबरात होणाऱ्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी डेमोक्रॅटिक पक्षातर्फे कमला हॅरिस यांची उमेदवारी पक्की झाली आहेच पण रिपब्लिकन उमेदवार डोनाल्ड ट्रम्प यांनी उपाध्यक्षपदाचे उमेदवार म्हणून ज्या जे. डी. व्हॅन्स यांची निवड केली, त्यांच्या पत्नी उषा व्हॅन्स (मूळच्या चिलूकुरी) या भारतीय वंशाच्या असून त्यांचे कुटुंब भारतातून येथे स्थलांतरित झालेले आहे. त्यामुळे काहीही झाले तरी, २०२५च्या जानेवारीत व्हाइट हाऊसमध्ये भारतीय वंशाची व्यक्ती असणारच, हे निश्चित आहे.यामुळे एकंदरीतच भारतीय मतदारांबद्दल फारच उत्सुकतेचे वातावरण तयार होताना दिसते. विशेषत: भारतात राहणाऱ्यांना अमेरिकी निवडणुकीत भारतीय मतदारांची वाढती संख्या पाहून यंदाच्या निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाच्या निकी हेली, विवेक रामास्वामी यांनी अध्यक्षपदाकरिता प्रयत्न केले आहेत. याआधी रिपब्लिकन पक्षाचेच बॉबी जिंदाल हेसुद्धा काही काळ राष्ट्रीय राजकारणात आपले नशीब अजमावू पाहत होते.

## प्रासंगिक »

### वीज म्हणाली...

***कमला हॅरिस यांची ईर्षा, ऊर्जा ट्रम्प यांच्याशी जाहीर चर्चेत दिसलीच; पण त्याहीपेक्षा लोभस ठरते ते अशा खुल्या वादसंवादांचे असणे..***

अमेरिकी अध्यक्षपदाच्या निवडणुकीतील उमेदवारांची नुकतीच प्रसारित झालेली जाहीर चर्चा ज्यांनी पाहिली त्यांच्या लोकशाही जाणिवांचे पारणे फिटले असेल. कमला हॅरिस आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यातील चर्चेची ही पहिली आणि कदाचित शेवटचीही फेरी. अध्यक्षपदाच्या स्पर्धेतून जो बायडेन बाद झाल्यापासून त्यांचे आव्हानवीर डोनाल्ड ट्रम्प का अस्वस्थ आहेत पण वाद- संवाद- प्रतिवाद या लोकशाहीच्या ‘बोलक्या’ मूल्यांचे जतन तेथे प्राणपणाने झाल्याचे दिसते. सर्वोच्च सत्ताधीशास जाहीर प्रश्न विचारता येणे, त्यानेही वाटेल त्या प्रश्नांस सामोरे जाण्याची हिंमत दाखवणे आणि आपल्या विरोधकास प्रतिप्रश्न करणे ही खरी निवडणूक पर्वणी! एरवी जनतेवर ‘जनार्दन’, ‘मतदार राजा’ वगैरे शब्दफुले वाहायची आणि त्याच वेळी त्या जनतेचे प्रश्न टाळत फक्त एकतर्फी संवाद साधायचा हे अमेरिकेत घडत नाही.

समाजशास्त्रात राज्यसंस्था अन् बाजारसंस्थेच्या पल्याड असलेला समूह ढोबळपणे ‘नागरी समाज’ म्हणून कल्पिला जातो. प्रगल्भ नागरी समाजाचे अस्तित्व हे लोकशाहीची मुळे खोलवर रुजवण्यात महत्त्वाचा वाटा उचलत असते, असे मानले जाते. ते काही अंशी खरेही आहे.

# ‘नागरी समाज’? हे तर राजकीय अवडंबर

कारण त्यांचा रेटा संस्थात्मक चौकटीवर अंकुश म्हणून काम करताना दिसतो जेणेकरून राज्यसंस्थेचे रूपांतर जुलमी राजवटीत होऊ नये. मागच्या काही आठवड्यांत कोलकाता बलात्कार प्रकरणावरून सबंध देशातील बदलापूरच्या घटनेने महाराष्ट्रातील एक विशिष्ट समूह मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरला पण तो कितपत प्रगल्भ नागरी समाजात मोडतो हे पाहणे आवश्यक ठरते.नागरी समाज आणि राज्यसंस्था यांच्या संबंधांवर अगदी अॅरिस्टॉटल पासून ते समकालीन काळापर्यंत मुबलक चर्चा झाली आहे. आजचा काळ हा प्रचंड वैचारिक अन् राजकीय ध्रुवीकरण झालेला काळ आहे. अशा काळात, नागरी समाजाचे राज्यसंस्थेशी असलेले संबंध पक्षीय राजकारणाच्या अवडंबरात नागरी समाजाला अप्रस्तुत ठरवतात, अशी शंका वा चिंता राज्यशास्त्राच्या अभ्यासकांना वाटते आणि ती खरीही ठरताना दिसते. आपला नागरी समाज वरवर राज्यसंस्थेपासून अन् बाजारसंस्थेपासून निराळा, स्वतंत्र



दिसत असला तरी तो या दोहींच्या कह्यात आहे ही त्याची प्राथमिक मर्यादा आहे. दुसरी गोष्ट अशी की त्याच्या ‘निवडक’ जाणिवा, त्याची वर्गीय, जातीय जागा (क्लास/ कास्ट लोकेशन) आदींमुळे या समूहाच्या क्षमता अधिकच मर्यादित झालेल्या आहेत. या मर्यादांचा प्रत्यय थेटपणे देणारे लक्षण म्हणजे, या नागरी समाजाो अस्तित्वभान हे अधूनमधून दिसणारे आणि एखाद्या ‘गाजणाऱ्या’ प्रश्नापुरते, मुद्द्यापुरते वा मागणीपुरते – म्हणजेच तात्पुरते- असते, जे दूरगामी परिणाम साधण्यासाठी पुरेसे नाही. तिसरी गोष्ट म्हणजे अशा नागरी समाजाची मुळातच मर्यादित किंवा कैकदा सोयीस्कर जडणघडण ही जुलमी राजवट थोपिवण्यासाठी परिणामकारक ठरत नाही, हेही दिसते. उदाहरणार्थ, ‘बलात्काराचे राजकारण करू नका’ अशी आवई सहसा अशा समूहांतून उठते किंवा उठवली जाते तेव्हा आपली राजकारणाची समजच गंडलेली असते. मुळात बलात्काराची कारणमीमांसा ‘पुरुषसत्ताक’ समाज व्यवस्थेकडे बोट दाखवणारी आहे. शिवाय जेव्हा आपण संघटित होऊन व्यवस्थेला जाब विचारत असतो ती देखील ‘राजकीय’ कृतीच असते. सत्ता संबंधाची सारी रूपे राजकारणाच्या कक्षेत येता मनसे आम्ही हे आंदोलन उभे केले म्हणू लागते आणि ‘महायुती’तल्या पक्षांचे अनुयायी गप्प राहातात, असे चित्र दिसले आणि ते समाजातही पाहायला मिळाले. राष्ट्रीय पातळीवर ‘एनडीए’मधले जे पक्ष ममता बॅनर्जी यांचा राजीनामा मागण्यात अग्रेसर होते, पश्चिम बंगाल बंद कसा कडकडीत होईल यासाठी मेहनत करत होते, तेच महाराष्ट्रात मात्र ‘महायुती’चा भाग म्हणून राज्य सरकारचा बचाव करण्याचा यत्न करताना दिसतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# गणपती, गौरी-महालक्ष्मींना विरोध!

## मनमोहन सिंग यांचे फोटो दाखवत फडणवीसांची टीका

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डीवाय चंद्रचूड यांच्या निवासस्थानी जाऊन श्री गणरायाचे दर्शन घेतल्यानंतर अनेकांनी यावर टीका केली आहे. महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा खटला न्यायालयात त्यामुळेच प्रलंबित राहिला आहे का? असा सवाल शिवसेना उबाठा गटाचे नेते संजय राऊत यांनी उपस्थित केला. तसेच विरोधकांनी न्यायपालिका आणि कार्यपालिकेमध्ये अंतर असायला हवे, अशी भावना व्यक्त केली. यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले आहे. यासाठी त्यांनी माजी सरन्यायाधीश के. जी. बाळकृष्णन आणि माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचा इफ्तार पार्टीतील फोटो पोस्ट केला आहे.**






देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले, “गणेशोत्सवाची देशभरात सर्वत्र धूम आहे. आस्थेने गणरायाचे पूजन केले जात आहे. काल तर गौरी-गणपतीतील महालक्ष्मीपूजन सुद्धा होते. देशाचे मा. सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूडजी यांच्याकडे काल मा. पंतप्रधानांनी गणरायाची आरती केली आणि महालक्ष्मी पूजन सुद्धा केले. सरन्यायाधीश महाराष्ट्रातील आहेत. दिल्लीत खास महाराष्ट्रीयन व्यक्तीकडूनच ते दरवर्षी गणरायाची मूर्ती पूजेसाठी आणतात. पण अचानक इकोसिस्टीम अशी कार्यान्वित झाली की, जणू आभाळ कोसळले. फरक फक्त इतकाच आहे की, आधीचे पंतप्रधान त्यांच्या निवासस्थानी इफ्तार पार्टी ठेवायचे आणि त्याला सरन्यायाधीश उपस्थित रहायचे. पण, गणपती आणि महालक्ष्मी पूजनाला मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी गेले तर इतका गहजब का?”“हिंदूत्त्वाला विरोध करता-करता आता गणपती आणि गौरी-महालक्ष्मींना विरोध करण्यापर्यंत का मजल जावी? प्रश्न गहन आहे.

हा महाराष्ट्रीयन सणांचा, महाराष्ट्र धर्माचा, मराठी संस्कृतीचा, गौरी-गणपतींच्या भक्ती आणि श्रद्धेचा अपमान नाही का?”, असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. तसेच १८ सप्टेंबर २००९ साली माजी सरन्यायाधीश केजी बाळकृष्णन यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानी आयोजित इफ्तार पार्टीला उपस्थित राहिल्याचे फोटोही पोस्टसह अपलोड केले आहेत.शिवसेना शिंदे गटाचे राज्यसभा खासदार मिलिंद देवरा यांनीही संजय राऊत यांच्या भूमिकेवर टीका केली. एएनआय वृत्तसंस्थेला दिलेल्या प्रतिक्रेयत ते म्हणाले, गणेश चतुर्थीनिमित्त राजकीय विरोधकही एकमेकांच्या घरी दर्शन घेण्यासाठी जात असतात. मी २० वर्षांपासून हे करत आलो आहे. पंतप्रधान मोदी यांच्या सरन्यायाधीश यांच्या घरी जाण्यावरून जी टीका होतेय, त्याचा स्तर खालावलेला आहे. यानंतर मिलिंद देवरा यांनीही २००९ साली माजी सरन्यायाधीश के. जी. बाळकृष्ण यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी आयोजित केलेल्या इफ्तार पार्टीला हजेरी लावल्याचा मुद्दा उपस्थित केला.

देवरा म्हणाले की, आता २००९ च्या घटनेवरही तुम्ही टीका करणार का? विरोधक खूपच अपरिपक्व अशी टीका करत आहेत. आरोप करण्यापूर्वी त्यांनी महाराष्ट्राची संस्कृती जाणून घेतली पाहीजे. देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडियावरील पोस्टमध्ये म्हटले, “गणेशोत्सवाची देशभरात सर्वत्र धूम आहे. आस्थेने गणरायाचे पूजन केले जात आहे. काल तर गौरी-गणपतीतील महालक्ष्मीपूजन सुद्धा होते. देशाचे मा. सरन्यायाधीश न्या. धनंजय चंद्रचूडजी यांच्याकडे काल मा. पंतप्रधानांनी गणरायाची आरती केली आणि महालक्ष्मी पूजन सुद्धा केले.दिल्लीत खास महाराष्ट्रीयन व्यक्तीकडूनच ते दरवर्षी गणरायाची मूर्ती पूजेसाठी आणतात. पण अचानक इकोसिस्टीम अशी कार्यान्वित झाली की, जणू आभाळ कोसळले. फरक फक्त इतकाच आहे की, आधीचे पंतप्रधान त्यांच्या निवासस्थानी इफ्तार पार्टी ठेवायचे आणि त्याला सरन्यायाधीश उपस्थित रहायचे. पण, गणपती आणि महालक्ष्मी पूजनाला मा. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी गेले तर इतका गहजब का?

### भक्ती आणि श्रद्धेचा अपमान नाही का?

”“हिंदूत्त्वाला विरोध करता-करता आता गणपती आणि गौरी-महालक्ष्मींना विरोध करण्यापर्यंत का मजल जावी? प्रश्न गहन आहे. हा महाराष्ट्रीयन सणांचा, महाराष्ट्र धर्माचा, मराठी संस्कृतीचा, गौरी-गणपतींच्या भक्ती आणि श्रद्धेचा अपमान नाही का?”, असा सवाल देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थित केला. तसेच १८ सप्टेंबर २००९ साली माजी सरन्यायाधीश केजी बाळकृष्णन यांनी तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानी आयोजित इफ्तार पार्टीला उपस्थित राहिल्याचे फोटोही पोस्टसह अपलोड केले आहेत.

---

# महापालिकेतील कर्मचाऱ्यांचे पगार विहित वेळेत द्यावे

## पगार 1 तारखेला मिळण्याबाबत कार्यवाही करा: आदित्य ठाकरे

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गेल्या अनेक महिन्यांपासून मुंबई महानगरपालिकेतील कर्मचारी व कामगारांना विलंबाने वेतन मिळत आहे. परिणामी, घर तसेच इतर कामांसाठी काढलेल्या बँकेच्या कर्जाचे हफ्ते वेळेवर भरता येत नसल्याने अनेकांवर दंडात्मक कारवाई होत आहे.**

या पार्श्वभूमीवर, कामगारांची आर्थिक अडचण दूर व्हावी, यासाठी त्यांचे पगार दर महिन्याच्या १ तारखेला मिळण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र पाठवून केली आहे. महानगरपालिकेच्या आस्थापना अनुसूचीवर जवळपास ९० हजार कामगार, कर्मचारी कार्यरत आहेत. सुमारे १ लाख १३ हजार सेवानिवृत्त वेतनधारक आहेत. सहा महिन्यांपूर्वी सर्वांना दर महिन्याच्या पहिल्या दिवशी वेतन मिळत होते. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून कामगार, कर्मचाऱ्यांच्या वेतनास विलंब होत आहे. काही दिसांपूर्वीच महापालिका कामगार सेनेने ही समस्या पालिका आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली होती. तसेच, ऑगस्ट महिन्यात स्टेट बँक ऑफ इंडियाकडेही चौकशी केली होती. बँकेकरून सकारात्मक प्रतिसाद मिळूनही समस्या जैसे थे आहे.गेल्या अडीच वर्षांहून अधिक काळ महापालिकेत लोकप्रतिनिधी नसल्याने प्रशासकीय राजवट लागू आहे.



करोना काळात सर्व यंत्रणा ठप्प असताना महापालिका कामगार, कर्मचारी जीव धोक्यात घालून काम करीत होते. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी त्यांना प्रतिदिन ३०० रुपये प्रोत्साहन भत्ता दिला होता, असे आदित्य ठाकरे यांनी पत्रात नमूद केले आहे.दरम्यान, सध्याचे सरकार पालिकेचा निधी अनावश्यक गोष्टींसाठी खर्च करीत असून कर्मचारी आणि इतर आवश्यक कामांसाठी राखून ठेवलेल्या मुदत ठेवी मोडण्याचा विक्रम करीत आहे.

### 1 लाख सेवानिवृत्त वेतनधारक

असा आरोप करीत पालिका कर्मचारी, कामगारांना विहित वेळेत वेतन देण्याची कार्यवाही सुरू करावी, अशी मागणी ठाकरे यांनी केली आहे.या पार्श्वभूमीवर, कामगारांची आर्थिक अडचण दूर व्हावी, यासाठी त्यांचे पगार दर महिन्याच्या १ तारखेला मिळण्याबाबत कार्यवाही करावी, अशी मागणी शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांना पत्र पाठवून केली आहे.महानगरपालिकेच्या आस्थापना अनुसूचीवर जवळपास ९० हजार कामगार, कर्मचारी कार्यरत आहेत. सुमारे १ लाख १३ हजार सेवानिवृत्त वेतनधारक आहेत.

# मला खुर्ची नको, राजीनामा द्यायला तयार

## डॉक्टरांनी चर्चेस नकार दिल्यानंतर ममता बॅनर्जींचं वक्तव्य

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कोलकाता येथील आर. जी. कर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणानंतर देशभर संतापाची लाट उसळली आहे, तसेच पश्चिम बंगालमध्ये राजकीय वादळ घोंगावत आहे. अशाततच पीडितेच्या नातेवाईकांसह रुग्णालयातील डॉक्टरांनी मोठं आंदोलन उभारून पश्चिम बंगाल सरकारला घेरलं आहे. या प्रकरणात मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याकडून योग्य सहकार्य केलं जात नसल्याचा आरोप होत आहे. हे प्रकरण दाबण्याकरता पीडितेच्या कुटुंबाला व इतरांना पैशांचं आमिष दाखवल्याचाही आरोप होत आहे.**



### मी माझी खुर्ची सोडण्यास तयार

आंदोलक डॉक्टरांची भेट घ्यायला गेलेल्या ममता बॅनर्जी यांना कोणीही भेटायला आलं नाही. बॅनर्जी तब्बल दोन तास पीडितेचं कुटुंब, नातेवाईक व आंदोलक डॉक्टरांची वाट पाहत होत्या. परंतु, त्यांच्यासमोर रिकाम्या खुर्च्यांव्यतिरिक्त इतर कोणीही नव्हतं. बराच वेळ वाट पाहून त्या निघून गेल्या.ममता बॅनर्जी सरकारने आंदोलक डॉक्टरांना तिसऱ्यांदा बैठकीसाठी बोलावलं होतं. मुख्यमंत्र्यांनी नबन्नाच्या सभागृहात बैठकीचं आयोजन केलं होतं. मात्र डॉक्टरांचं शिष्टमंडळ त्यांना भेटलंच नाही.परंतु, ही मागणी ममता बॅनर्जी यांनी मान्य केली नाही. त्यामुळे त्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला. सभागृहातून बाहेर पडताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, न्यायासाठी मी माझी खुर्ची सोडण्यास तयार आहे.

दरम्यान, आंदोलक डॉक्टरांची भेट घ्यायला गेलेल्या ममता बॅनर्जी यांना कोणीही भेटायला आलं नाही. बॅनर्जी तब्बल दोन तास पीडितेचं कुटुंब, नातेवाईक व आंदोलक डॉक्टरांची वाट पाहत होत्या. परंतु, त्यांच्यासमोर रिकाम्या खुर्च्यांव्यतिरिक्त इतर कोणीही नव्हतं. बराच वेळ वाट पाहून त्या निघून गेल्या.ममता बॅनर्जी सरकारने आंदोलक डॉक्टरांना तिसऱ्यांदा बैठकीसाठी बोलावलं होतं. मुख्यमंत्र्यांनी नबन्नाच्या सभागृहात बैठकीचं आयोजन केलं होतं. मात्र डॉक्टरांचं शिष्टमंडळ त्यांना भेटलंच नाही. या चर्चेचं थेट प्रक्षेपण करण्याची मागणी आंदोलकांनी केली होती. परंतु, ही मागणी ममता बॅनर्जी यांनी मान्य केली नाही. त्यामुळे त्यांनी या बैठकीवर बहिष्कार टाकला. सभागृहातून बाहेर पडताना ममता बॅनर्जी म्हणाल्या, न्यायासाठी मी माझी खुर्ची सोडण्यास तयार आहे.दरम्यान, ममता बॅनर्जी यांनी राज्यातील जनतेची माफी मागितली आहे. त्यांनी समाजमाध्यमांवर एक व्हिडीओ जारी केला आहे. यामध्ये त्यांनी जनतेची माफी मागितली. तसेच त्या म्हणाल्या, “लोकांच्या हितासाठी मी राजीनामा देण्यास तयार आहे”. दुसऱ्या बाजूला आंदोलकांनी म्हटलं आहे की “सरकार त्यांच्या मागण्या मान्य करत नाही तोवर हे आंदोलन असंच चालू राहील”.ममता बॅनर्जी म्हणाल्या, मी ज्युनियर डॉक्टरांबरोबर चर्चा करण्याचा पूर्ण प्रयत्न केला. मी तीन दिवस त्यांची वाट पाहिली. त्यांनी एकदा यावं आणि त्यांच्या समस्या सांगाव्या. त्यांनी सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय नाकारला आहे. मला या सगळ्याचं खूप वाईट वाटतंय. मी देश आणि राज्यातील लोकांची माफी मागते. ज्यांना वाटतंय त्यांनी या आंदोलनाचं समर्थन करावं, माझी काहीच हरकत नाही. मला वाटतं की सामान्य नागरिकांना न्याय मिळावा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांनुसार डॉक्टरांनी आता त्यांच्या कर्तव्यावर परत जायला हवं.आंदोलक डॉक्टरांची भेट घ्यायला गेलेल्या ममता बॅनर्जी यांना कोणीही भेटायला आलं नाही. बॅनर्जी तब्बल दोन तास पीडितेचं कुटुंब, नातेवाईक व आंदोलक डॉक्टरांची वाट पाहत होत्या. परंतु, त्यांच्यासमोर रिकाम्या खुर्च्यांव्यतिरिक्त इतर कोणीही नव्हतं. बराच वेळ वाट पाहून त्या निघून गेल्या.

ममता बॅनर्जी सरकारने आंदोलक डॉक्टरांना तिसऱ्यांदा बैठकीसाठी बोलावलं होतं. मुख्यमंत्र्यांनी नबन्नाच्या सभागृहात बैठकीचं आयोजन केलं होतं. मात्र डॉक्टरांचं शिष्टमंडळ त्यांना भेटलंच नाही. या चर्चेचं थेट प्रक्षेपण करण्याची मागणी आंदोलकांनी केली होती. परंतु, ही मागणी ममता बॅनर्जी यांनी मान्य केली नाही. कोलकाता येथील आर. जी. कर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात प्रशिक्षणार्थी डॉक्टर तरुणीवर बलात्कार करून तिची हत्या केल्याच्या प्रकरणाने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणानंतर देशभर संतापाची लाट उसळली आहे, तसेच पश्चिम बंगालमध्ये राजकीय वादळ घोंगावत आहे. अशाततच पीडितेच्या नातेवाईकांसह रुग्णालयातील डॉक्टरांनी मोठं आंदोलन उभारून पश्चिम बंगाल सरकारला घेरलं आहे.

# भारताने तेव्हा तीन दहशतवाद्यांना सोडलं

## IC814 विमान अपहरणावर फारुक अब्दुल्लाह पहिल्यांदाच बोलले

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अनुभव सिन्हा दिग्दर्शित 'आय सी ८१४ : दी कंदहार हायजॅक' ही वेबसीरिज गेल्या महिन्यात नेटफ्लिक्स या ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाली आहे. ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शाह, पंकज कपूर, मनोज पाहवा, अरविंद स्वामी, पत्रलेखा व अभिनेता विजय वर्मा या कलाकारांनी या सीरिजमध्ये भूमिका साकारल्या आहेत.**




### दहशतवाद्यांना सोडून मोठी चूक केली

तिथे ओलिस ठेवलेले प्रवासी व क्रू आणि अतिरेकी यांच्यामध्ये देवाणघेवाण झाली. या दहशतवाद्यांनी त्यानंतर जगभर मोठा उच्छाद मांडला. त्यामुळे आजही अनेकांना वाटतं की भरत सरकारने तेव्हा या दहशतवाद्यांना मुक्त करायला नको होतं.दरम्यान, या विमान अपहरण प्रकरणावर आधारित वेब सीरिजची सर्वत्र चर्चा आहे. यावर वेगवेगळ्या प्रतिक्रिया देखील येत आहेत. अशातच जम्मू काश्मीरचे तत्कालीन मुख्यमंत्री भारत सरकारने तुरुंगातून मुक्त केलेल्या तीन दहशतवाद्यांपैकी एक दहशतवादी मुश्ताक अहमद जरगर हा तेव्हा काश्मीरमधील तुरुंगात होता.

२४ डिसेंबर १९९९ रोजी पाच दहशतवाद्यांनी नेपाळची राजधानी काठमांडूहून दिल्लीला जाणारं इंडियन एअरलाईन्सचं एक विमान उड्डाणानंतर ४० मिनिटांनी ताब्यात घेतलं होतं. त्यानंतर दहशतवाद्यांनी ते विमान अमृतसर, लाहोर, दुबई असा प्रवास करून कंदहारला नेलं.दहशतवाद्यांनी आठ दिवस विमान त्यांच्या ताब्यात ठेवलं आणि विमानातील प्रवासी व क्रू सदस्यांना ओलीस ठेवलं. या सर्वांना मुक्त करण्याच्या बदल्यात अपहरणकर्त्यांनी भारत सरकारकडे दहशतवादी मसूद अझहर, उमर शेख आणि मुश्ताक अहमद जरगर या तीन दहशतवाद्यांची तुरुंगातून सुटका करण्याची मागणी केली होती. तत्कालीन परराष्ट्र व्यवहार मंत्री जसवंत सिंह हे त्या दहशतवाद्यांना विशेष विमानाने कंदहारला घेऊन गेले.

# गणेश उत्सवाचे शास्त्र



गणेश चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये गणपतीची मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुल, पत्री, नैवेद्य इत्यादी सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध एकवीस पत्री अर्पण केल्या जातात. त्यामध्ये फराळ आगळा यांची २१ जोडी गणपतीला अर्पण केली जाते. पावसाळ्यात या सर्व पत्रे सामान्यता उपलब्ध असतात आणि प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्म सुद्धा आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तर पूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी काही मंत्रही म्हणतात. जिथे गणपती बसवायचा असतो, तेथे मखर किंवा विविध साधनांनी सजावट केली जाते, लाइटिंग लावली जाते, गणपतीला वेगवेगळ्या पदार्थांचा नैवेद्य दररोज दिला जातो. लाडू व मोदक यांचा भोग लावल्या जातो. तसेच गणपतीची नावे वेगवेगळी आहेत. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेश उत्सव साजरा केला जातो. एका मान्यतेनुसार श्रीगणेशाच्या अवतारांपैकी गणेश यांचा जन्म व भाद्रपद शुद्ध चतुर्थीला महादेव शिवशंकरांनी कैलास पर्वतावर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला याच दिवशी जन्मोत्सव साजरा केला. श्रीगणेश यांनी शिंदूर दैत्यावर विजय मिळवला. तो दिवस भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा होता. त्यामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला ती पूर्व परंपरा आजही पाळली जाते. चतुर्थी श्री गणेशाची अत्यंत प्रिय तिथी आहे. चतुर्थी म्हणजे जागृती स्वप्न सुशुप्ती या पलिकडील अवस्था आहे. गणेश चतुर्थीचा उत्सव सार्वजनिक रित्या शनिवार वाड्यात सुरू केला गेला. व हा मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने साजरा केला जातो.

## गणेश उत्सव विषयी पौराणिक कथा!

शिवपुराणाध्ये गणपती विषयीचा एक उल्लेख आढळतो. त्यामध्ये पार्वती एके दिवशी नंदीला द्वारपाल म्हणून नियुक्त करून स्नान करण्यास गेलीअसता यावेळी शंकर तेथे आले. त्यांनी नंदीस झुगारून न्हाणीघरात प्रवेश केला. यामुळे पार्वती अपमानित व रागाने क्षुब्ध झाली. शेवटी सखी जया व विजया यांच्या सल्ल्याने चिखलापासून एका सुंदर पुत्राची मूर्ती तिने निर्माण केली व त्यात प्राण फुंकले या पुत्रास तिने स्वतःचा अनुचर म्हणून नेमले नंतर एकेदिवशी या कुमार मुलास दारी नेमून पार्वती स्नानास गेली असता, शंकर तेथे उपस्थित झाले. यावेळी त्या कुमाराने शंकरास अडवले. पहिल्यांदा कुमारसोबत त्यांचा वाद व नंतर पार्वतीच्या मनातील रागाप्रमाणे युद्ध झाले. शिव व सर्व देवतागण या लढाईत पराजित झाले. तेव्हा नारदाच्या सल्ल्याने विष्णूद्वारे कुमारास मोहित करून शंकरांनी त्याचे मुंडके उडविले ही वार्ता ऐकून पार्वतीने क्रुद्ध होऊन सृष्टी नष्ट करण्यास प्रारंभ केला. नारद व देवगणांनी पार्वतीला शांत केले. तेव्हा पार्वतीने तिच्या पुत्राच्या पुनर्जीवनाची मागणी केली व तिचा पुत्र सगळ्यांना पूज्य व्हावा, अशी इच्छा व्यक्त केली. शंकरांनी त्यास होकार दिला. परंतु कुमाराचे मस्तक कोठेही न मिळाल्याने त्यांनी गणांस उत्तर दिशेस पाठवले व प्रथम जो प्राणी दिसेल त्याचे मस्तक आणण्याची आज्ञा केली. एका हत्तीचे मस्तक घेऊन उपस्थित झाले. देवगणांनी ह्या मुंडक्याच्या साहाय्याने कुमारास जिवंत केले. तर प्रांत शंकरांनी या मुलास स्वपुत्र म्हणून स्वीकारले व देवगण यांच्या आशिर्वादाने हा मुलगा पूज्य झाला व श्री गणेश नावाने प्रसिद्ध झाला. तसेच आणखीन एक गणपती विषयी अख्यायिका आहे. एकदा गणपती चतुर्थीचे स्वतःचे आवडीचे मोदक खाऊन उंदराच्या पाठीवरून जात होता. वाटेत साप दिसल्याने उंदिर भयाने कापू लागला. यामुळे गणपती उंदराच्या पाठीवरून खाली पडला व त्याचे पोट फाटून मोदक बाहेर पडले. गणपतीने ते सारे मोदक पुनः पोटात टाकले व पोटावर साप बांधला. हे दृश्य पाहून आकाशातील चंद्र हसू लागला. म्हणून तुझ्या रूपास चतुर्थीस कोणी दर्शन घेणार नाही. जो तुझे रूप पाहिल त्याचावर संकट येईल. असा शाप चंद्राला दिला, अशीही एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.



# किशनचे निवडसमितीला प्रत्युत्तर!

## किशनची दुलीप ट्रॉफी सामन्यात चौकार-षटकारांची लयलूट

नवी दिल्ली । वृत्तसंस्था





**भारतीय क्रिकेट संघाचा यष्टिरक्षक-फलंदाज इशान किशन हा अतिशय प्रतिभावान क्रिकेटपटू आहे आणि त्याने हे पुन्हा सिद्ध केले. दुलीप ट्रॉफी २०२४ सऱ्या टप्प्यात, त्याला शेवटच्या क्षणी भारत सी संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये स्थान देण्यात आले आणि त्यानंतर त्याने आश्चर्यकारक कामगिरी केली. त्याने भारत ब संघाविरुद्ध प्रथण श्रेणी क्रिकेट कारकिर्दीतील सातवे शतक झळकावले. इशान किशनचा या मोसमातील हा पहिलाच सामना असून पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावून आपली उपयुक्तता सिद्ध केली. त्याबरोबर टीम इंडियासाठी पुन्हा खेळण्यासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.**

देशांतर्गत सामन्यांमध्ये भाग न घेतल्याने इशान किशनला या हंगामात बीसीसीआयने केंद्रीय करारातून वगळले होते, परंतु आपली चूक सुधारत त्याने देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला. त्याबरोबर मैदानत परतताच शतकी खेळी केली. इशान किशनने या सामन्यात १०३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. यादरम्यान त्याने २ षटकार आणि १४ चौकार मारले. या सामन्यात इशान किशनने १२६ चेंडूंचा सामना करत ३ षटकार आणि १४ चौकारांच्या मदतीने १११ धावा केल्या आणि तो मुकेश कुमारच्या चेंडूवर बाद झाला. आता इशान किशनने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार पुनरागमन केले आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्याचे नाव संघात नव्हते, पण तरीही तो प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील झाला. दुखापतीमुळे तो पहिला सामना खेळू शकला नव्हता, मात्र दुसऱ्या सामन्यात तो अचानक संघात आला आणि त्याने दमदार शतक झळकावले. मात्र, या सामन्यात तो फलंदाज म्हणून खेळत आहे, कारण त्याच्या संघात अभिषेक पोरेल यष्टिरक्षक म्हणून खेळत आहे. इशान किशनने चौथ्या क्रमांकावर खेळत हे शतक झळकावले आहे. दुलीप ट्रॉफीमध्ये खेळण्यापूर्वी, इशान किशन बुची बाबू स्पर्धेत खेळत होता आणि तिथेही त्याने या मोसमात शतक झळकावले होते. इशान किशनच्या प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्दीबद्दल सांगायचे तर, या सामन्यापर्यंत त्याने ५० सामने खेळले होते. या सामन्यांमध्ये त्याने ३०६३ धावा केल्या आहेत आणि ६ शतके ठोकली आहेत. इशान किशनची प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आतापर्यंतची सर्वोत्तम धावसंख्या २७३ धावा आहे. त्याने या सामन्यांमध्ये विकेटच्या मागे १०१ झेलही घेतले आहेत तर ११ खेळाडूंना स्टंप आऊट करण्यात यश मिळवले आहे.देशांतर्गत सामन्यांमध्ये भाग न घेतल्याने इशान किशनला या हंगामात बीसीसीआयने केंद्रीय करारातून वगळले होते, परंतु आपली चूक सुधारत त्याने देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला. त्याबरोबर मैदानत परतताच शतकी खेळी केली. इशान किशनने या सामन्यात १०३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. यादरम्यान त्याने २ षटकार आणि १४ चौकार मारले. या सामन्यात इशान किशनने १२६ चेंडूंचा सामना करत ३ षटकार आणि १४ चौकारांच्या मदतीने १११ धावा केल्या आणि तो मुकेश कुमारच्या चेंडूवर बाद झाला.

### 14 चौकारांच्या मदतीने 111 धावा

देशांतर्गत सामन्यांमध्ये भाग न घेतल्याने इशान किशनला या हंगामात बीसीसीआयने केंद्रीय करारातून वगळले होते, परंतु आपली चूक सुधारत त्याने देशांतर्गत क्रिकेट खेळण्याचा निर्णय घेतला. त्याबरोबर मैदानत परतताच शतकी खेळी केली. इशान किशनने या सामन्यात १०३ चेंडूत आपले शतक पूर्ण केले. यादरम्यान त्याने २ षटकार आणि १४ चौकार मारले. या सामन्यात इशान किशनने १२६ चेंडूंचा सामना करत ३ षटकार आणि १४ चौकारांच्या मदतीने १११ धावा केल्या आणि तो मुकेश कुमारच्या चेंडूवर बाद झाला.

आता इशान किशनने देशांतर्गत क्रिकेटमध्ये दमदार पुनरागमन केले आहे. सर्वात मोठी गोष्ट म्हणजे त्याचे नाव संघात नव्हते, पण तरीही तो प्लेइंग इलेव्हनमध्ये सामील झाला. दुखापतीमुळे तो पहिला सामना खेळू शकला नव्हता, मात्र दुसऱ्या सामन्यात तो अचानक संघात आला आणि त्याने दमदार शतक झळकावले. मात्र, या सामन्यात तो फलंदाज म्हणून खेळत आहे, कारण त्याच्या संघात अभिषेक पोरेल यष्टिरक्षक म्हणून खेळत आहे. इशान किशनने चौथ्या क्रमांकावर खेळत हे शतक झळकावले आहे. दुलीप ट्रॉफीमध्ये खेळण्यापूर्वी, इशान किशन बुची बाबू स्पर्धेत खेळत होता आणि तिथेही त्याने या मोसमात शतक झळकावले होते. इशान किशनच्या प्रथम श्रेणी क्रिकेट कारकिर्दीबद्दल सांगायचे तर, या सामन्यापर्यंत त्याने ५० सामने खेळले होते. या सामन्यांमध्ये त्याने ३०६३ धावा केल्या आहेत आणि ६ शतके ठोकली आहेत. इशान किशनची प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये आतापर्यंतची सर्वोत्तम धावसंख्या २७३ धावा आहे. त्याने या सामन्यांमध्ये विकेटच्या मागे १०१ झेलही घेतले आहेत तर ११ खेळाडूंना स्टंप आऊट करण्यात यश मिळवले आहे.

कारकिर्दीतील सातवे शतक झळकावले. इशान किशनचा या मोसमातील हा पहिलाच सामना असून पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावून आपली उपयुक्तता सिद्ध केली. त्याबरोबर टीम इंडियासाठी पुन्हा खेळण्यासाठी सज्ज असल्याचे दाखवून दिले.

# भारत दौऱ्यासाठी बांगलादेशचा कसोटी संघ जाहीर!

## हत्येचा आरोप असणारा बांगलादेशचा खेळाडू संघात कायम

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था : महाईन्यूज




**बांगलादेशने भारत दौऱ्यासाठी आपला कसोटी संघ जाहीर केला आहे. भारत दौऱ्यावर बांगलादेश दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळणार आहे. पाकिस्तानला घरच्या मैदानावर कसोटी मालिकेत पराभूत केल्यानंतर आता बांगलादेश संघाची नजर टीम इंडियाविरुद्धच्या शानदार कामगिरीकडे आहे. त्यामुळेच बांगलादेशने आपल्या संघात एकच मोठा बदल केला आहे.**

त्याचबरोबर खुनाचा आरोप असलेल्या शकीब अल हसनला संघात कायम ठेवण्यात आले आहे.बांगलादेशने अनकॅप्ड फलंदाज जॅकर अली अनिकचा संघात समावेश केला आहे, तर वेगवान गोलंदाज शरीफुल इस्लामला दुखापतीमुळे संघाबाहेर ठेवण्यात आले आहे. या वर्षी अमेरिका आणि वेस्ट इंडिजच्या भूमीवर खेळल्या गेलेल्या टी-२० विश्वचषक २०२४ मध्ये जॅकर अली अनिक बांगलादेश संघाचा एक भाग होता. जॅकर अली हा यष्टीरक्षक-फलंदाज आहे आणि त्याने बांगलादेशसाठी आतापर्यंत १७ टी-२० सामने खेळले आहेत, ज्यात त्याच्या नावावर २४५ धावा

### पहिला सामना 19 सप्टेंबरपासून

परंतु तसे झाले नाही आणि त्याचा कसोटी संघात समावेश करण्यात आला आहे.भारताने शेवटचे २०१९-२० मध्ये बांगलादेशचे यजमानपद भूषवले होते. या कसोटी मालिकेत टीम इंडियाने बांगलादेशचा २-० असा पराभव केला. पहिल्या कसोटी सामन्यासाठी भारताने आधीच आपला संघ जाहीर केला आहे. भारत आणि बांगलादेश यांच्यातील पहिला कसोटी सामना १९ सप्टेंबरपासून चेन्नईत सुरू होणार आहे.

आहेत.सध्या शकीब अल हसन खुनाच्या आरोपांमुळे चर्चेत आहे. बांगलादेशने यापूर्वी पाकिस्तान दौऱ्यावर दोन सामन्यांची कसोटी मालिका खेळली होती, त्यादरम्यान शकीबवर हत्येचा आरोप करण्याला आला होता. आता या आरोपांदरम्यान, भारताविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेसाठी शकीब संघात कायम आहे. हत्येच्या आरोपांमुळे बांगलादेश बोर्ड शकीब अल हसनला भारत दौऱ्यासाठी संघाचा भाग बनवणार नसल्याचा अंदाज बांधला जात होता.